# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली

**E-mail – nhmgadchiroli2021@gmail.com**

---

## मोबाईल मेडीकल युनिट करिता पदे भरण्याकरिता थेट मुलाखत

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्हा एकात्मीक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी गडचिरोलीचे मार्फतीने चालविण्यात येणाऱ्या मोबाईल मेडीकल युनिट करिता खालील पदे कंत्राटी / रोजंदारी पद्धतीने भरण्यासाठी ईच्छूक व अर्हताधारक उमेदवारांच्या थेट मुलाखती **दिनांक ०६ /०३/२०२४ रोजी सकाळी १० वाजता राष्ट्रीय शहिद विर बाबूराव शेडमाके सभागृह, जिल्हा परिषद, गडचिरोली** येथे घेण्यात येणार असून त्याकरिता उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित राहावे.

| अ.क्र. | पदाचे नांव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | दरमहा मेहनताना |
|---|---|---|---|---|
| १ | स्त्री वैद्यकिय अधिकारी | १२ | MBBS OR BAMS with Registration of MMC/ MCIM | Rs. 60000/- for MBBS & Rs. 40000/- for BAMS |
| २ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०३ | HSC, DMLT with registration of MSBTE, Mumbai | Rs. 18000/- |
| ३ | औषधी निर्माता | ०२ | D.Pharma OR B.Pharma with registration of Maharashtra State Pharmacy Council | Rs. 18000/- |

१) सदर पदे ही निव्वळ तात्पूरत्या स्वरुपाची असून पदांचा नियुक्ती कालावधी हा दिनांक २९/०६/२०२४ पर्यंत किंवा राज्यस्तरावरुन सदर युनिट चालविण्यासाठी संस्था निवड होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल, तोपर्यंत राहील. तसेच सदर पदे ही तात्पूरत्या स्वरुपाची असल्याने पदाकरिता निवड झालेल्या उमेदवारांना राज्य शासनाच्या किंवा राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदांवर दावा करता येणार नाही.

२) पदाकरिता देय दरमहा मेहनताना हा त्यांचे कामकाजाचे दैनंदिन हजेरीवर (शासकिय सुट्टी बाबत सुट वगळून) अवलंबून असेल. याव्यतिरिक्त अन्य कोणताही भत्ता दिला जाणार नाही.

३) पदनिहाय विहित परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील.

४) उमेदवार महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असणे बंधनकारक आहे.

५) उमेदवारांनी मुलाखतीचे वेळी सर्व आवश्यक मुळ कागदपत्रे तसेच १ स्वसाक्षांकित झेरॉक्स बंच सादर करणे आवश्यक राहील. अर्जाचा नमुना मुलाखतीचे वेळी पुरविण्यात येईल.

६) भरती प्रक्रिया रद्द करणे, पदे कमी-जास्त करणे व इतर सर्व अधिकार हे अध्यक्ष, निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गडचिरोली यांचेकडे राखीव ठेवलेले आहेत.

**विशेष सुचना : राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तसेच १५ व्या वित आयोगांतर्गत सुपर स्पेशालिस्ट, स्पेशालिस्ट, वैद्यकिय अधिकारी (MBBS/BAMS) ची रिक्त असलेली सर्व पदे भरेपर्यंत दर बुधवारी (शासकिय सुट्टी असल्यास त्यानंतर लगतच्या कार्यालयीन कामकाजाचे दिवशी) ईच्छूक व अर्हताधारक उमेदवारांच्या जिल्हा परिषद, गडचिरोली येथे मुलाखती घेण्यात येईल, याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.**

अध्यक्ष (निवड समिती) तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद गडचिरोली

सदस्य सचिव (निवड समिती) तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद गडचिरोली

CamScanner